**<u>नियमित दिवाणी अपील क्र. ९५/२०१८.</u>**

## (निशाणी २९ खाली आदेश )

सदरचा आदेश या अर्जालगतच पारित करीत असल्यामुळे त्यातील मजकूर पुन्हा नमूद करण्याचे कारण नाही. अर्ज पाहिला. सोबतचे प्रतिज्ञापत्र पाहिले. संपूर्ण प्रकरण बारकाईने पाहिले. विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

२. या प्रकरणात नेमलेली नियत तारीख दिनांक २६.१०.२०१८ आहे. मात्र, या प्रकरणात अपिलार्थी वसंत माने यास दावामिळकतीचे मोजणीचे फर्मान नुकतेच प्राप्त झाल्याचे त्याचे म्हणणे आहे. सदरची मोजणी उद्या दिनांक २४.१०.२०१८ रोजी निश्चित करण्यात आल्याचे उपअधिक्षक भूमीअभिलेख, मंगळवेढा यांच्या त्या जावक क्रमांक १५८४ च्या फर्मानावरून दिसते.

३. मात्र, केवळ दावामिळकतीची मोजणी झाली, म्हणजे दावामिळकतीवरील अपिलार्थी म्हणत असलेला त्यांचा ताबा लगेचच हिरावून घेतला जाईल, असे नव्हे. फक्त मोजणी होण्याने ताबा जाण्याची मुळीच शक्यता नाही. तसेही सदर प्रकरणी नेमलेली तारीख अवघ्या तीन दिवसांनंतर, म्हणजे दिनांक २६.१०.२०१८ आहेच. त्यामुळे विरुद्धपक्षास स्थगितीबाबतच्या अर्जाची प्रत देऊन त्यांचे म्हणणे घेऊन त्या अर्जावर उभयपक्षांना युक्तिवाद करण्याची संधी देऊन आवश्यक तो आदेश आवश्यकतेप्रमाणे पारित करण्यात येईल.

(चकोर श्रीकृष्ण बाविस्कर)

दिनांक : २३.१०.२०१८. **जिल्हा न्यायाधीश -३, पंढरपूर.**

<u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | A. K.B. Shaikh. (Jr.Clerk) |
| b) | Court | : | District Judge 3, Pandharpur. |
| c) | Order signed by P. O. | : | 23.10.2018. |
| d) | Order uploaded on | : | 24.10.2018. |